# नवोद्योजकासाठी विद्यापीठात सहायता कक्ष: डॉ पराग काळकर




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, व रिसर्च पार्क फौंडेशन यांचा वतीने, नाविन्यपूर्ण शोध व त्याचे व्यवसायात रूपांतर करण्यासाठी उद्योजकता विकास सहाय्यता कक्षा द्वारे मार्ग करण्यासाठी विशेष तज्ञांचे मार्गदर्शन दिले जाणार असून याद्वारे, युवांकाच्या नवकल्पना ,उद्योजकता आणि शाश्वत विकास व्यवसाय विकासाला प्रोत्साहन दिले जाईल असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरु डॉ पराग काळकर यांनी सांगितले. विद्यापीठात आरपीएफ च्या वतीने सुरू करण्यात आलेल्या विशेष तज्ञ मार्गदर्शन सहाय्यता कक्षाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी या केंद्राचे कार्यकारी अधिकारी डॉ. अरविंद शालिग्राम व केन्द्रातील स्टार्टअप्स, नवोदित उद्योजक , विद्यार्थी व इतर अनेक तज्ञ मार्गदर्शक उपस्थित होते.

या विद्यापीठात रिसर्च पार्क फाउंडेशनच्या माध्यमातून नविन शैक्षणिक धोरण म्हणजेच एनईपी 2020 ला अनुसरून इंटर्नशिप प्रोजेक्ट्स, स्टार्टअप इंडिया व उद्योग संलग्न कार्यक्रम या विशेष उपक्रमाना प्रोत्साहन दिले जाते. तसेच उद्योग आणि शिक्षणामध्ये अधिक दृढ संबंध निर्माण होण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. या माध्यमातून ग्रामीण शहरी युवकांना या केंद्राचा विशेष लाभ होत आहे याच उपक्रमाचा एक भाग म्हणून नवीन उद्योजकांना व त्यांच्या

उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी व या योजनाची अधिक प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी व त्या प्रमाणे त्यांच्या संशोधनाचे नवनिर्मिती मध्ये रूपांतर होण्यासाठी योग्य त्या पातळीवर जर त्यांना विशेष मार्गदर्शन व वैयक्तिक सल्ला मिळाला तर त्यातून त्यांच्या उद्यमशिलतेला व रोजगार निर्मितीला चालना मिळू शकते. नव उद्योजकांच्या यशस्वी वाटचालीमध्ये त्यांना अनेक अडथळ्यांवर मात करून पुढे जावे लागते. त्यांना योग्य वेळी योग्य त्यपद्धतीने मार्गदर्शन मिळणे अपेक्षीत असते अन्यथा त्यांच्यामध्ये उदासीनता येवून ते प्रवाहाच्या बाहेर पडतात . परंतु या उपक्रमामुळे त्यांना योग्य तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार आहे. आरपीएफ ने सुरु केलेल्या विशेष अभियानामुळे स्टार्टपना निश्चितपणे सहायता सुविधा मिळणार असून खऱ्या अर्थाने उद्योग व शिक्षण संस्थांमध्ये भागीदारी वाढवण्यास मदत होईल व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या उद्दिष्टांना पाठबळ मिळून युवकांच्या यशस्वी व उज्वल भवितव्यासाठी नवीन द्वारे उघडण्यास मदत होणार आहे त्याचबरोबर त्यांची कौशल्य वाढून व त्यांचा आत्मविश्वास बळकट होऊन राष्ट्र उभारणीसाठी मदत होईल. सदर केंद्रामधील तज्ञ मार्गदर्शक स्टार्टअप यांच्या मागणीनुसार व सोयीनुसार उपलब्ध करून देण्याचे केंद्रप्रमुख डॉ.अरविंद शाळीग्राम यांनी आश्वासित केले. विशेष तज्ञांचे मार्गदर्शन केंद्राची सुरुवात , हा एक गतिमान उपक्रम असून हे केंद्र शासन आणि नवोदित उद्योजकांना मार्गदर्शन मिळून त्यांच्या कल्पनांना ठोस आकार देण्यासाठी एक प्रभावी माध्यम ठरेल व त्यतून सशक्त उद्योजकीय समुदाय उभारण्याची दिशा निश्चित केली जाईल असे केंद्राचे कार्यकारी अधिकारी डॉ. अरविंद शालिग्राम यांनी सांगितले.या उपक्रमाचे सर्वांनी स्वागत केले.